# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक ०१ जुलै, २०२५/ आषाढ १०, १९४७ (शके)**

**७३.** महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव यांचे दालन क्रमांक १४०४-ड, चौदावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक ०४ जुलै, २०२५ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

(१) **श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७७**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) **श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६०**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(3) **श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४९**

"राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(४) श्री.प्रसाद लाड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५४**

"राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(५) श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७२**

"विदर्भातील अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. अमरावती येथे या पाचही जिल्ह्यांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विद्यापीठ असून या विद्यापीठात वाशिम, अकोला व बुलढाणा या भागातील लाखों विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता अमरावती येथे दिडशे किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन प्रवास करुन विद्यार्जनासाठी जावे लागते, परिणामी त्यांचे श्रम, वेळ व पैसा खर्ची जात असतो, या भागातील लाखों विद्यार्थ्यांची अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरीता बुलढाणा येथे "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असणे, या भागात शैक्षणिक बाबींचे जलदगतीने संनियंत्रण व नियोजन होण्याच्या दृष्टीने बुलढाणा येथे उपरोक्त तीन जिल्ह्यांकरिता "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ०१ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १
महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत :-</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) सचिव - १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव - २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव - ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) सचिव - ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
१०) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, विधान भवन, मुंबई
११) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१२) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
१३) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)